ARTHA
( Fortnightly )
Poona 4
Tel. 55627

# अर्थ

LICENCED TO POST
WITHOUT
PREPAYMENT
Reg. No. MH. 80. Licence No. 175

वर्ष ३६ | पुणे, बुधवार, ५ ऑगस्ट, १९७० | अंक १५

छोट्या माणसाची सतत सेवा हीच आमची अभिमानास्पद परंपरा



छोटे धंदेवालेच
बँक ऑफ महाराष्ट्र ला
मोठे वाटतात

हे स्वाभाविकच आहे. कारण बँक ऑफ महाराष्ट्र ही छोटया लोकांचीच बँक आहे. अल्प भांडवल असलेले, कारागीर, टॅक्सीवाले, रिक्षावाले वगैरेना बँक आजपर्यंत मदत करीत आलेली आहे.

आमचे ७०% कर्जदार या वर्गातीलच आहेत. १०,००० रु. हून कमी रकमांची कर्जे घेतलेले १२,००० लोक आहेत. असे एकूण २८ कोटी रु. कर्जरूपाने दिलेले आहेत.

तुमच्याही छोट्या-मोठ्या धाडसात तुम्हाला महाराष्ट्र बँकेचे आर्थिक साहाय्य खचितच मिळू शकते.

तपशीलासाठी आजच चौकशी कराः

बँक ऑफ महाराष्ट्र

हेड ऑफिसः ११७७ बुधवार पेठ, पुणे-२

69100

# विविध माहिती

**संस्कृत भाषेतील दैनिक** — "सुधर्मा" ह्या नावाचे छोट्या आकाराचे संस्कृत दैनिक मद्रासमध्ये प्रसिद्ध होऊ लागले आहे. प्रत्येक प्रतीची किंमत ५ पैसे आहे.

**उन्हासाठी वेगळा चष्मा नको** — उजेड प्रखर झाला की काळा होणाऱ्या आणि उजेड कमी झाला म्हणजे काळसरपणा नाहीसा होणाऱ्या चष्म्यांच्या काचा प. जर्मनीतील एक फर्म लवकरच विक्रीस काढणार आहे.

**विषप्रयोग टाळण्यासाठी माओंच्या पत्नीची दक्षता** — माओत्से तुंगच्या प्रत्येक खाण्याच्यावेळी त्याचे खाद्यपदार्थ त्याची पत्नी चव घेऊन पाहते. त्याच्यावर शत्रूचा विषप्रयोग होऊ नये ह्यासाठी ही दक्षता आहे.

**रोख पैसे मिळण्याची 'युनिकार्ड' योजना**—युनियन बँकेने तिच्या पसंतीच्या खातेदारांना युनिकार्ड आणि खास पाच युनिकार्ड चेक्सचे चेकबुक देण्यास प्रारंभ केला आहे. प्रत्येक चेक १०० रुपयांचा असतो. हे युनिकार्ड दाखवून, बँकेच्या कुठल्याही शाखेतून किंवा अधिकृत दुकानातून चेकचे पैसे घेता येतात.

**राष्ट्रीयीकृत बँकांचे डिव्हिडंड**—बहुतेक सर्व राष्ट्रीयीकृत बँकांना नुकसानभरपाईचे सरकारी रोखे मिळाले आहेत. त्यावरील व्याज त्यांना गेल्या महिन्यात मिळाले. त्यामुळे बँका आता डिव्हिडंड देऊ शकतील.

**न्यू इंडिया अॅश्युअरन्स कंपनी**— न्यू इंडियाला गेल्या वर्षी हप्त्यांचे उत्पन्न २५.६० कोटी रु. झाले. १९६८ च्या उत्पन्नापेक्षा हे उत्पन्न १.५२ कोटी रु. नी अधिक आहे.

**प्रश्नपत्रिका फुटण्यावर उपाय**— कराची विद्यापीठाने वरचेवर प्रश्नपत्रिका फुटण्यावर उपाय म्हणून पोलिसांची मदत मागितली आहे. मोठे उद्योगपती आणि गिरणीमालक ह्यांची मुले परीक्षकांशी संगनमत करून पेपरातील प्रश्न परीक्षेच्या आधीच हस्तगत करतात, अशी तक्रार आहे.

**प्रमुख व्यक्तींच्या गौरवाप्रीत्यर्थ पोस्टाची तिकिटे**— १९७१ मध्ये खालील प्रमुख व्यक्ती आणि घटना ह्यांच्या गौरवार्थ पोस्टाची खास तिकिटे काढण्यात येतील. सी. एफ. अॅन्ड्र्यूज, गुरु रविदास, शिरगणती पूर्ण होण्याची शताब्दी, रमण महर्षी, राजा रविवर्मा, दादासाहेब फाळके, स्वामी विरजानंद, बालदिन १९७१, सखाराम गणेश देउसकर, अल्प-बचत योजना आणि जागतिक काटकसर दिन, लष्करी टपाल सोयी आणि आचार्य नरेंद्र देव. पाश्चिमात्य स्वररचनाकार बीथोवेन, ह्यांच्या स्मृत्यर्थही खास तिकीट काढले जाईल.

**परदेशी चलननिधी** — भारताचा परदेशी हुंडणावळ निधी मार्च, १९६९ मध्ये ५७६ कोटी रु. होता, तो मार्च, १९७० मध्ये ८२१ कोटी रु. झाला आहे.

**नवाबांच्या वंशजांचे पेन्शन बंद होणार** — संस्थानिकांच्या तनख्याबरोबरच पूर्वीचे नवाब आणि राजे ह्यांच्या वंशजांची पेन्शने आणि 'वझिफा' बंद करण्याचे मध्यवर्ती सरकारने ठरविले आहे. संस्थानिकांच्या तनख्यांची वार्षिक रक्कम ४ कोटी रु. होते, तर नवाबांच्या वंशजांच्या पेन्शनांची वार्षिक रक्कम २३ लक्ष रु. भरते. ह्या वंशजांत सुरत, औंध, अरकाट आणि मलबार येथील नवाबांच्या वंशजांचा समावेश आहे. त्यांच्या पेन्शनांना घटनेचे संरक्षण नसल्यामुळे ती बंद करण्याला काहीच अडचण भासणार नाही.

**कांडला बंदरातून चहाची निर्यात** – भारताच्या चहाची निर्यात सामान्यतः कलकत्ता बंदरामधून होते. परंतु गेले काही दिवस तेथील बंदर-कामगारांनी संप चालू ठेवला होता. त्यामुळे ईशान्य भारतामधील चहाच्या मळेवाल्यांची फार कुचंबणा झाली. ह्यावर उपाय म्हणून काही मळेवाल्यांनी प्रयोग म्हणून कांडला बंदरातून चहा निर्यात करण्यास प्रारंभ केला आहे. बंदरातून अलीकडे ४५ हजार पेट्या माल ब्रिटनला रवाना झाला.

**भिलई पोलादाच्या १२ वॅगन्स बेपत्ता** – भिलई येथील पोलाद कारखान्याने १२ वॅगन्स भरून पोलादी माल पाठविला, त्यांपैकी फक्त एकच वॅगन योग्य ठिकाणी पोचली. बाकीच्या वॅगन्समधील माल इतर स्टेशनांवर बनावट रेल्वे पावत्यांच्या आधारे उतरवून घेऊन लांबविण्यात आला.

**ताडीच्या विक्रीतील घट** — मुंबईमधील ताडीच्या विक्रीत घट झाली आहे. गेल्या वर्षी ताडीची २३० दुकाने होती. १ सप्टेंबर, १९७० रोजी सुरू होणाऱ्या वर्षासाठी फक्त १८५ दुकानांना लायसेन्स दिली जातील. २८ जुलै हा दुकानांच्या लिलावाचा शेवटचा दिवस होता. त्यावेळी फक्त १७० दुकानांचा लिलाव होऊ शकला; बाकीच्या १५ दुकानांची लिलावाची किमान किंमतही न आल्याने त्यांचे लिलाव पुढे ढकलावे लागले. गेल्या वर्षी २३० दुकानांचा लिलाव ७० लक्ष रुपयांना झाला होता. आता १७० दुकानांचा लिलाव ४१.५ लक्ष रुपयांना झाला आहे. हातभट्टीवाल्यांनी आपल्या दारूचे भाव कमी केल्यामुळे ताडीला मागणी कमी झाली आहे असे ताडीच्या दुकानदाराचे म्हणणे आहे.

**नॅशनल बुक ट्रस्टची प्रगती** — नॅशनल बुक ट्रस्टने १९६९-७० मध्ये १०६ पुस्तके प्रसिध्द केली; १९६५-६६ मध्ये फक्त १७ पुस्तके प्रसिध्द करण्यात आली होती. विक्रीचा आकडाहि १८,००० रु. वरून ५,२५,००० रु. वर गेला आहे.

**भिकाऱ्यांकडून बांधकाम करून घेणार** – महाराष्ट्रातील सरकारी इमारतींच्या बांधकामावर भिकाऱ्यांना काम देण्याचे ठरविण्यात आले आहे. बेगर होम्स आणि सर्टिफाईड स्कूल्स ह्यांच्या बागायतीवरही त्यांना कामास लावले जाईल.

# ☆ अर्थ ☆

बुधवार, ५ ऑगस्ट, १९७०





संस्थापक :
प्रा. वामन गोविंद काळे
संपादक :
श्रीपाद वामन काळे


*“अर्थ एव प्रधानः” इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र*

## भारताच्या लोकप्रियतेचा अनुक्रम खालचा

जपानमधील एका वृत्तसंस्थेने काही प्रश्नांच्या बाबतीत तेथील जनमत अजमावण्याचा प्रयत्न अलीकडे केला. त्यावरून असे दिसून आले की लोकप्रियतेच्या दृष्टीने जपानी लोकांच्या मनात भारताचा अनुक्रम बराच खाली लागतो. जपानमध्ये भरलेल्या एक्स्पो प्रदर्शनात हिंदच्या दालनातील पांढरा वाघच प्रमुख आकर्षण होऊन बसला आहे अशी बोलवा आहे. वृत्तसंस्थेने विचारलेल्या प्रश्नांत, एकात जपानी लोकांना आवडणाऱ्या तीन देशांची नांवे देण्याची विनंती करण्यात आली होती. लोकांनी ह्या प्रश्नाला अनुलक्षून दिलेल्या उत्तरांत स्वित्झरलंडचा क्रमांक पहिला लागला. त्या देशाला ३५ टक्क्यांहून अधिक मते पडली. त्यानंतर फ्रान्सचा क्रमांक लागला. नंतर अनुक्रमे अमेरिका, ब्रिटन, पश्चिम जर्मनी, सोव्हिएट रशिआ ह्यांचे क्रम लागले. भारताला अवघी ३ टक्के मते पडली तर चीनला त्याहीपेक्षा कमी म्हणजे २·३ टक्के मते पडली. वास्तविक भारत हा आशिआतील एक प्रमुख देश असल्याने जपानमध्ये लोकप्रियतेच्या बाबतीत त्याने बराच वरचा क्रमांक मिळविण्यास हरकत नसावी. ह्याचा अर्थ असा होतो की भारताविषयी जपानला अद्याप पुरेशी माहिती नाही. त्यामुळे अर्थातच जपानी नागरिक भारताविषयी विशेष आस्था दाखवीत नाही. आर्थिक विकासाच्या बाबतीत जपान हा आशिआतील एक पहिल्या प्रतीचा देश आहे. आशिआ खंडाच्या औद्योगिक जीवनात जपानला असाधारण महत्त्व आहे. त्या दृष्टीने पाहता भारत व जपान ह्यांच्यांतील व्यापारी व इतर क्षेत्रांतील देवाण–घेवाण अधिक प्रमाणात होणे आवश्यक आहे. लहान शेतकऱ्यांचा देश म्हणून जपान प्रसिद्ध आहे, हेही ह्या संदर्भात लक्षात घेतले पाहिजे.

—

## विद्यार्थ्यांच्या दंगलीवर अजब उपाय : शिक्षणाच्या दुकानदारांच्या धंद्यावर परिणाम !

मध्य प्रदेश सरकारने “मध्य प्रदेश विश्वविद्यालय विधी (संशोधन) अध्यदेश १९७०”· नावाचा ऑर्डिनन्स काढला आहे. त्याअन्वये, कुणाही उमेदवाराला कॉलेजात पाऊलही न टाकता बी. ए., एम्. ए., बी. कॉम्, एम. कॉम्. आणि बी. एससी ह्या परीक्षांना बसता येईल. आतापर्यंत, फक्त शिक्षक, स्त्रिया आणि ग्रंथपाल एवढ्यांनाच ही सवलत उपलब्ध होती. मध्य प्रदेशाचे आजवरचे धोरण असे आहे की किमान मार्क मिळणाऱ्या विद्यार्थ्याला कॉलेजात प्रवेश मिळण्याचा हक्कच आहे; कॉलेजात पुरेशी जागा, शिक्षकवर्ग, सोयी, इत्यादी असोत वा नसोत. त्याचा परिणाम म्हणजे सर्व कॉलेजे विद्यार्थ्यांनी तुडुंब भरून जावयाची; शिक्षणाचा दर्जा खाली जावयाचा, विद्यार्थ्यांच्या दंगली व्हायच्या. आता काढलेल्या ऑर्डिनन्समुळे विद्यार्थ्यांची कॉलेजातील गर्दी कमी होईल अशी सरकारची अपेक्षा आहे. विद्यार्थ्यांचा खर्च वाचेल. त्यांनी घरीच अभ्यास करून किंवा न करून एकदम विद्यापीठाच्या परीक्षांना बसावयाचे अशी ही योजना आहे. विद्यार्थ्यांच्या दंगली त्यामुळे कमी होतील, असे आम्हांस वाटत नाही. कारण, विद्यार्थ्यांना दिवसभर वेळ घालविण्यासाठी कॉलेजात जावेसे वाटणारच. शिक्षणाचा दर्जा मात्र आणखी खाली गेल्याखेरीज राहणार नाही. कॉलेज चालविण्याच्या ‘धंद्या’ वरही प्रतिकूल परिणाम होण्याचा संभव आहे. मध्य प्रदेशात अशी शिक्षणाची दुकाने पुष्कळ आहेत की ज्यांत विद्यार्थ्यांची फक्त नावे नोंदविली जातात आणि त्यांना पुरेसे दिवस हजर असल्याचा दाखला दिला जातो. विद्यार्थ्यांना एवढेच हवे असते.

—

## पोलिसांचा विमा उतरण्याची योजना

पश्चिम बंगालमधील शांतता व सुव्यवस्था ह्यांना धोका देणारे प्रसंग अलीकडे वरचेवर होऊ लागले आहेत. संप, मोर्चे, निदर्शने ह्यांना कोणतेही मोठे कारण लागत नाही अशी परिस्थिती आहे. ह्या अशा परिस्थितीला तोंड देण्यासाठी बंगालच्या पोलिसदलाला नेहमीच सज्ज राहावे लागते. अनेकदा अशा दंगलींत पोलिस जखमी होतात. जखमी पोलिसांना उपचार अर्थातच होतात. परंतु जमावाला तोंड देण्यासाठी पोलिसांचे धैर्य अढळ असावे लागते. त्यांना स्वतःच्या प्राणाची तर भीती असतेच; पण बरावाईट प्रसंग आला तर बायकामुलांचे काय होईल ह्याचीही चिंता साहजिकच असते. बंगालमध्ये सुमारे ६० हजार पोलिस आहेत. कामगिरी करीत असताना पोलिस पंगू झाला अगर दगावला तर त्याला विम्याचे संरक्षण देण्याचा विचार चालू झाला आहे.

—

## बँकांजवळील ठेवी वाढविण्याच्या प्रयत्नांची आवश्यकता

१९६९ सालच्या जुलै महिन्यात हिंदमधील १४ प्रमुख बँकांचे राष्ट्रीयीकरण करण्यात आले. त्यानंतरच्या वर्षभरात ह्या बँकांकडे आकर्षित होणाऱ्या ठेवींचे प्रमाण घटले असल्याचे आढळून आले आहे. राष्ट्रीयीकरण झालेल्या वर्षाच्या पूर्वीच्या वर्षाशी तुलना करता ९५ कोटी रुपयांच्या ठेवी कमी आल्या. बँकिंगच्या व्यवसायात ठेवींना अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. पैसा गोळा होत राहिला तरच कर्जे देण्याची बात, हे उघडच आहे. तेव्हा राष्ट्रीयीकरण झालेल्या बँकांनी ठेवी जमविण्याची गती वाढविण्यासाठी आटोकाट प्रयत्न करावयास हवेत. गेल्या काही वर्षांत ग्रामीण भागात पैसा मोठ्या प्रमाणावर खेळू लागला आहे. निदान रोखीची पिके घेणाऱ्या बागायतदारां-जवळ तरी मुबलक पैसा झाला आहे. ग्रामीण भागात बँकिंगच्या सोयीही आता झपाट्याने वाढत आहेत. पण तेथील पैसा ठेवींच्या रूपाने बँकांत येईल काय हा खरा प्रश्न आहे. ग्रामीण भागातील लोक आपल्याजवळील पैसा चैनीच्या व अनावश्यक बाबींवर मोठ्या प्रमाणावर खर्च करताना आढळून येतो. ह्या बाबतीत श्रीमंत शेतकरी व गरीब शेतकरी ह्यांच्यात फारसा भेद दिसत नाही. ग्रामीण श्रीमंतावर शेतीच्या उत्पन्नावर कर बसविणे राजकीय दृष्ट्या जमणारे नाही. तेव्हा इतर काही मार्गांनी त्यांच्याजवळील पैसा बँकांजवळ येईल असे मार्ग शोधून काढण्यात आले पाहिजेत. एरव्ही ग्रामीण भागात पैसा ग्राहकोपयोगी वस्तूंवर खर्च करण्याची आधीच असलेली वृत्ती वाढीस लागेल आणि त्यामुळे किमती वाढत जाण्यास आणखीच मदत होईल. ग्रामीण भागातील लोकांच्या, पैसा खर्च करण्याच्या सवयींना इष्ट वळण लावण्यात आले पाहिजे.

---

## राजकारणाचा धंदा गेला; दुसरा मिळत नाही

ब्रिटनमध्ये नुकत्याच झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत हुजूर पक्षाने मजूर पक्षाचा पराभव केला. ह्या राजकीय घडामोडीमुळे मजूर पक्षातील काही पार्लमेंटच्या सभासदांवर बाका प्रसंग गुदरला आहे. त्यांच्यापैकी एकाला ब्रिटनच्या सामाजिक सुरक्षिततेच्या योजनेप्रमाणे मिळणाऱ्या माधुकरीवर गुजराण करावी लागत आहेत. सध्या त्याला दर आठवड्याला १० पौंड अथवा हिंदी रुपयांच्या चलनात १८० रुपये मिळत आहेत. त्यांनी काम पाहिजे अशी जाहिरातही दिली आहे. पण एकेकाळी पोस्टात काम केलेल्या ह्या ब्रिटिश खासदाराला अद्याप काम मिळालेले नाही. मजूर पक्षाच्या फंडातून मदत म्हणून त्यांना १०० पौंड देण्यात आले आहेत. ह्यापेक्षा अधिक मदत घेण्याची त्यांची तयारी नाही. कारण ती घेतल्यास सामाजिक सुरक्षितता भत्ता मिळण्याचे बंद होण्याची भीती आहे.

---

## बँकांकडील ठेवींच्या वाढीची गती

राष्ट्रीयीकृत १४ बँकांकडील ठेवीत १९ जुलै, १९६८ ते २९ जून, १९६९ ह्या काळात ३३४ कोटी रु. ची वाढ झाली होती. १८ जुलै १९६९ ते १९ जून १९७० ह्या काळातील ठेवीमध्ये फक्त २९८ कोटी रु. ची भर पडली. म्हणजे, त्यात ३६ कोटी रु. चा फरक आहे.

१४ बँकांपैकी ४ बँका ( सेंट्रल बँक ऑफ इंडिया, पंजाब नॅशनल बँक, युनायटेड बँक ऑफ इंडिया आणि बँक ऑफ महाराष्ट्र ) वगळल्या, तर बाकी सर्व बँकांची ठेवींमधील वाढ पूर्वीपेक्षा असमाधानकारक झाली.

| ठेवींमधील वाढ कायम राखणाऱ्या बँका | राष्ट्रीयीकरणा-पूर्वीचे ११ महिने ( कोटी रु. ) | त्यानंतरचे ११ महिने ( कोटी रु. ) |
|---|---|---|
| १ सेंट्रल बँक ऑफ इंडिया | ३५.४ | ४८.६ |
| २ पंजाब नॅशनल | २५.४ | ३०.० |
| ३ युनायटेड बँक | १८.२ | १८.९ |
| ४ बँक ऑफ महाराष्ट्र | १०.५ | ११.४ |
| **ठेवींमधील वाढ कमी झालेल्या बँका** | | |
| १ बँक ऑफ इंडिया | ४९.४ | ३५.७ |
| २ बँक ऑफ बरोडा | ४४.४ | ३४.३ |
| ३ युनायटेड कमर्शिअल बँक | २८.४ | २३.३ |
| ४ कॅनरा बँक | २७.८ | २५.५ |
| ५ देना बँक | १९.२ | ११.८ |
| ६ सिंडिकेट बँक | २६.३ | २२.५ |
| ७ युनियन बँक | १६.२ | १५.८ |
| ८ अलाहाबाद बँक | १०.९ | ८.८ |
| ९ इंडियन बँक | १०.८ | ४.२ |
| १० इंडियन ओव्हरसीज बँक | ११.२ | ७.२ |

---

## किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि.

किर्लोस्कर ऑइल एंजिन्स लि. च्या संचालकांनी ३१ मार्च १९७० अखेर संपलेल्या वर्षाकरिता १०% डिव्हिडंड सुचविले आहे. गेल्या वर्षी प्रत्येक शेअरला एक नवा शेअर बोनस म्हणून दिला; अशा रीतीने वाढलेल्या शेअर भांडवलावरील हे डिव्हिडंड आहे. १९६८–६९ साठी कंपनीने जुन्या भांडवलावर १६% डिव्हिडंड दिले होते. म्हणजे, प्रत्यक्षात, जास्त डिव्हिडंड देण्यात आले आहे. इक्विटी डिव्हिडंड देण्यास ४०.२५ लक्ष रु. आणि प्रेफरन्स डिव्हिडंड देण्यास ४.१६ लक्ष रु. लागतील. मागील वर्षी २६.३० लक्ष रु. डिव्हिडंड म्हणून वाटले गेले होते. १९६९–७० मध्ये कंपनीचा ढोक नफा ४.३९ कोटी रु. वरून ३.०९ कोटी रुपयांवर आला आणि निव्वळ नफा १.५१ कोटी रु. वरून ९६ लक्ष रुपयांवर आला.

## आडसाली उसास करावयाच्या पीक कर्ज पद्धतीचा फेरविचार होणे आवश्यक

### रिझर्व्ह बँकेच्या धोरणामुळे जिल्हा बँकांच्या साधन-संपत्तीवर पडणारा ताण


लेखक : पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील चेअरमन,
अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि.


शेती कर्जपुरवठ्याचा "पीक कर्ज पद्धती" हा कणा असून ही यशस्वी रीतीने कार्यवाहीत आणली गेल्यासच शेतकऱ्यांचे पीक-संवर्धनाचे प्रश्न सुटणार आहेत. शेतकरी स्वतःच्या शेतात जी पिके घेणार आहेत त्यांच्या संवर्धनासाठी हंगामानुसार व आवश्यकतेनुसार शेती मशागत, बी बियाणे, खते, औषधे, मजुरी, इत्यादीकरता कर्ज देऊन हे कर्ज त्या विशिष्ट पिकाच्या विक्रीतूनच वसूल करावयाचे, हे पीक कर्ज पद्धतीमागील सूत्र आहे. महाराष्ट्रातील सर्व जिल्हा सहकारी बँकांनी ही पद्धती मान्य केली असून राज्य सहकारी बँकेच्या मार्गदर्शनाखाली आपल्या व्यवहारांत कसोशीने अमलात आणीत आहेत.

### व्यावहारिक भूमिका घेणे जरूर

एकदा पीक कर्ज पद्धतीचे तत्त्व मान्य केल्यानंतर कर्जवितरण व कर्जवसुली यांचे हंगाम व कालावधी त्या विशिष्ट पिकास आवश्यक असणाऱ्या नैसर्गिक परिस्थितीवर अवलंबून राहाणे अपरिहार्य आहे. उदाहरणार्थ, कपाशी लागवड १५ एप्रिलचे सुमारास होऊन दिपवाळीचे सुमारास कापूस विक्रीकरता बाजारात येतो व एकूण विक्रीचा हंगाम मार्चचे आंत संपतो. त्यामुळे कर्जवितरणास १५ एप्रिलपासून सुरुवात करावी लागेल व वसूल मार्चचे आत करावा लागेल हे सहाजिक आहे. हीच बाब इतर पिकांनाही लागू असून त्याबाबत कुणाचे दुमत नाही. मतभेद आहेत ते आडसाली उसासारख्या १८ महिन्यांच्यावर कालावधी घेणाऱ्या पिकांच्या बाबतीत. रिझर्व्ह बँकेने या बाबतीत फेरविचार करून व्यावहारिक भूमिका घेणे जरूर आहे. रिझर्व्ह बँकेच्या कायद्यानुसार पीक कर्ज हे अल्पमुदत कर्ज असून कर्ज १५ महिन्यांपेक्षा जास्त मुदतीचे असू शकत नाही. आडसाली उसास करावयाच्या पीक कर्ज पद्धतीचा फेरविचार होणे अत्यंत अगत्याचे आहे.

### प्रतिवर्षी आडसाली लागणीत होणारी वाढ

आडसाली उसाखाली जास्त काळ जमीन गुंतून राहात असली तरी दोन पावसाळ्यांचा फायदा व टनेजमध्ये भरीव वाढ या कारणांमुळे एकसाली उसापेक्षा आडसाली उसाची वाढ मोठ्या प्रमाणात झालेली आहे. तसेच क्षेत्राच्या प्रमाणात बँकेचे आडसाली उसाकरिता दिलेले कर्ज वाढत आहे. दर वर्षी वाढत्या क्षेत्राबरोबरच या प्रश्नाचे स्वरूप अधिक गंभीर होत चालले आहे.

### बँकेची पाहणी व निष्कर्ष

सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे हा कर्जपुरवठा रिझर्व्ह बँकेकडून फक्त १२ महिन्यांकरिता मिळतो. परंतु जिल्हा बँकेस सभासदांना त्याच मुदतीकरिता कर्जपुरवठा करून भागणार नाही कारण आडसाली उसाची लागण व तो गळितास साखरकारखान्यांत जाऊन त्याची किंमत मिळणे या क्रियेस १८ महिन्यांपेक्षा जास्त कालावधी लागतो.

बहुतेक आडसाली उस लागणीनंतर १८ व १९ महिन्यांनी गळितास गेला, ही परिस्थिती सर्व साखर कारखान्यांनी सरासरी काढून निवेदन केलेली आहे. काही व्यक्तिगत केसेसमध्ये २० ते २२ महिन्यानंतर आडसाली उसाचे गळीत झाले आहे. गळीत झाल्यानंतर उसाचे पेमेन्ट वर्ग होण्यास सर्वसाधारणपणे एक महिना धरला तर असे विधान निश्चितपणे करता येईल की आडसाली उसाचे पैसे लागणीनंतर साधारणपणे १८ ते २० महिन्यांनी मिळतात. हीच परिस्थिती सुरू व खोडवा उसाचे बाबतीत आहे. या उसाचे गळीत होण्यासही किमान १९ महिने लागतात. येथे आडसाली उसापुरतीच चर्चा मर्यादित करण्याचे योजिले आहे.

### रिझर्व्ह बँकेचे धोरण

आडसाली उसाकरिता किमान १८ महिन्यांच्या मुदतीने कर्जपुरवठा करणे जरुर आहे. मात्र रिझर्व्ह बँक नियमानुसार १२ महिन्यापेक्षा जास्त मुदतीचा पीक कर्जपुरवठा करीत नाही. राज्य सहकारी बँक दरसाल ३ महिने मुदतवाढ देऊन व्यवहारी दृष्टिकोन स्वीकारते परंतु रिझर्व्ह बँक आपल्या तत्त्वापासून ढळण्यास तयार नाही. या बाबतीत या बँकेने पुढाकार घेऊन सभा, परिषद, या सनदशीर मार्गाने या प्रश्नाची निकड लावली परंतु अद्यापही हा प्रश्न सुटू शकला नाही.

एका शेतकऱ्याला दिलेले आडसाली ऊस कर्ज वसूल होण्याअगोदर दुसऱ्या वर्षाकरिता आडसाली ऊस कर्ज द्यावे लागते. उदा. १५ जून, १९६८ रोजी लागण झालेल्या आडसालीचे कर्ज वसूल होण्याअगोदर १५ जून, १९६९ च्या लागणीकरिता कर्ज द्यावे लागते व बँकेच्या साधनसंपत्तीवर दुहेरी ताण पडतो. प्रथम गुंतवलेला पैसा मोकळा होण्याअगोदर दुसरी गुंतवणूक करावी लागणे आवश्यक असणारे दुसरे पिक नाही, त्यामुळे आडसाली ऊस कर्जाचा प्रश्न खास विचार करून सोडविला पाहिजे.

### जिल्हा बँका स्थिरावणार कशा

रिझर्व्ह बँकेकडून १२ महिन्यांच्या मुदतीने कर्ज घेऊन ते १८ ते २० महिन्यांच्या मुदतीने वाटावयाचे व शिवाय पहिले कर्ज वसूल न होता दुसरे कर्ज द्यावयाचे या दोन बाबींमुळे जिल्हा बँकांच्या साधनसंपत्तीवर गंभीर ताण पडतो. जिल्हा बँकांना शेतकऱ्यांच्या मूलभत व व्यावहारिक अडचणींचा विचार करावा लागतो. त्यामुळे कायद्यावर बोट ठेवून भागणार नाही. आजही रिझर्व्ह बँकेच्या कायद्यात पीक कर्ज १५ महिने मुदतीने देण्याची तरतूद आहे. तेव्हा कायद्यातील आहे या तरतुदीनुसार

रिझर्व्ह बँकेकडून किमान १५ महिन्यांचे मुदतीने कर्ज मिळाल्याशिवाय जिल्हा बँका स्थिरावणार नाहीत व शेतकऱ्यांची संपूर्ण सेवा करू शकणार नाहीत. कारण सुरुवातीस म्हटल्याप्रमाणे पीक कर्ज पद्धतीचे प्रमुख तत्त्वच अमान्य झाल्यास पीक संवर्धनाचे प्रश्न सुटणार कसे ?

इतर पिकांच्या कर्जफेडीच्या तारखा जशा पेरणी व त्या पिकाची विक्री यांच्याशी निगुडित धरल्या जातात त्याच तत्त्वावर आडसाली उस लागण व त्याची किंमत शेतकऱ्यांच्या पदरात पडेपर्यंतचा कालावधी ठेवणे जरूर आहे, तेव्हा रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने हा व्यावहारिक दृष्टिकोनच आडसाली पीक कर्जाचे बाबतीत ठेवावा.

मला आशा आहे की, कृषि-उद्योगाचा पाया असलेली आपली देशाची अर्थव्यवस्था बळकट करण्याकरिता रिझर्व्ह बँक हा प्राथमिक व अत्यंत महत्त्वाच्या प्रश्नांची उकल तातडीने करील. 'सहकार शक्ति' २३-७-७०

## आयुर्विमा कॉर्पोरेशनचे नवे प्रसिद्धिप्रमुख श्री. वि. वा पत्की यांची नेमणूक

सुप्रसिद्ध मराठी लेखक श्री. वि. वा. पत्की, यांची आयुर्विमा कॉर्पोरेशनचे जनतासंपर्क अधिकारी म्हणून नेमणूक झाली असून त्यांनी आपल्या कामाचा चार्ज घेतला आहे.

श्री. पत्की गेली २७ वर्षे प्रसिद्धी व्यवसायात असून , प्रथम १४ वर्षे त्यांनी महाराष्ट्र सरकारच्या प्रसिद्धी खात्यात ,सातारा, अहमदनगर, कोल्हापूर, पुणे व मुंबई येथे निरनिराळ्या हुद्द्यांवर काम केले. १९५९ साली ते प्रसिद्धितंत्र आणि जनतासंपर्कशास्त्र यांच्या खास अभ्यासासाठी इंग्लंडला गेले व त्यांनी त्या शास्त्रातील डिप्लोमा लंडनच्या पॉलिटेक्निक या जगप्रसिद्ध संस्थेतून मिळविला. इंग्लंडहून परत आल्यानंतर ते आयुर्विमा कॉर्पोरेशनच्या प्रसिद्धी खात्यात उपप्रमुख म्हणून दाखल झाले. त्या ठिकाणी ते ८ वर्षे होते. १९६६ साली त्यांनी युनिट ट्रस्टचे प्रसिद्धी प्रमुख म्हणून नेमणूक झाली. गेली ४ वर्षे ते या पदावर होते व आता आयुर्विमा कॉर्पोरेशनचे प्रसिद्धी प्रमुख म्हणून त्यांची नेमणूक झाली आहे.

कादंबऱ्या, लघुकथा, लघुनिबंध, प्रवासवर्णन, इत्यादी विविध प्रकारचे विपुल लेखन त्यांनी केले असून प्रा. ना. सी. फडके यांच्या समग्र साहित्याचा परामर्श घेणारा ९०० पृष्ठांचा ग्रंथ त्यांनी लिहून टीकाकार म्हणूनही रसिकमान्यता मिळविली आहे.

## चोरून नाणी पाडणारी टांकसाळ

अमेरिकन डॉलर आणि इंग्लिश सॉव्हरिनची खोटी नाणी पाडणारी एक टांकसाळ जाफना येथे पोलिसांनी उघडकीस आणली आहे.

## जनरल इन्शुअरन्सचे राष्ट्रीयीकरण कशासाठी ? विमा कंपन्यांचे निवेदन

जनरल इन्शुअरन्स कंपन्यांच्या फंड्सपैकी ७५% रक्कम सरकारमान्य रोख्यातच गुंतविण्यात आली पाहिजे, असे आजही बंधन आहे आणि त्या कंपन्या १००% रक्कमही अशा रोख्यात गुंतविण्यास तयार होतील. सरकारने जनरल इन्शुअरन्स कंपन्यांचे राष्ट्रीयीकरण करण्याचे ठरविलेच, तर ते संपूर्णतः राजकीय हेतूनेच केलेले ठरेल. १९६७ अखेरच्या आकड्यांप्रमाणे, त्यांच्याजवळची गुंतविण्याजोगी रक्कम ७१ कोटी रुपये होती. राष्ट्रीयीकृत बँकांकडील ठेवींची रक्कम २,७४२ कोटी रु. आणि लाइफ इन्शुअरन्स फंडाची रक्कम १,४३४ कोटी रु. आहे. म्हणजे, जनरल इन्शुअरन्स् कंपन्यांजवळील रक्कम अत्यल्प आहे. त्यात दरसाल फक्त ५ कोटी रु. ची भर पडत जाते. कंपन्यांचा वार्षिक नफा सुमारे २·५ कोटी रु. असतो. आयुर्विम्यामध्ये विम्याची रक्कम निश्चित असल्या कारणाने क्लेम्सचे पैसे देणे सोपे असते; जनरल इन्शुअरन्समध्ये प्रत्येक क्लेमची रक्कम तपासून पाहून विमेदार आणि कंपनी ह्या दोघांनाही समाधानकारक रीतीने ठरवावयाची असते. ह्या पद्धतीने दरसाल सुमारे ५ लक्ष क्लेम्सच्या रकमा दिल्या जातात आणि त्यासाठी व्यवस्थापनाच्या वेगवेगळ्या थरांना तारतम्य वापरण्याचे अधिकार दिलेले असतात. जनरल इन्शुअरन्सच्या १३० कंपन्यांतील स्पर्धेमुळे विमेदारांची सोय पाहण्यासाठी तत्परतेच्या बाबतीतही चढाओढ असते. गेल्या १५ वर्षांत विम्याचे हप्ते अनेकवार उतरविण्यात आले आहेत. एजंटांचे कमिशनचे दर खूपच कमी केलेले आहेत, त्याचा फायदा विमेदारांना मिळत आहे. जनरल इन्शुअरन्स हा एकमेव असा धंदा आहे की त्यात व्यवस्थापनाचा खर्च कायद्याने नियंत्रित केलेला आहे आणि ह्या धंद्याने, सर्वसाधारणपणे विचार करता, ह्या मर्यादेत चांगला कारभार करून दाखविला आहे.

## स्वस्त सिगारेटसमुळे विड्यांना धोका

स्वस्त सिगारेटसमुळे विडीच्या धंद्याच्या विकासाला धोका प्राप्त झाला आहे. वझीर सुलतान सिगारेट कंपनीच्या कारखान्याने १७ पैशांचे १० सिगारेटसचे पाकीट बाजारात आणले आहे. भारतातील सिगारेटच्या धंद्याच्या भांडवलापैकी ८०% भांडवल परदेशी अमलाखालील आहे आणि विड्यांचा धंदा बसवून टाकण्याचा त्याचा बेत दिसत आहे. इतर सिगारेटसच्या विक्रीतील नफ्याच्या काही भागाचा उपयोग स्वस्त सिगारेटस् बाजारात आणण्याकडे केला जात असावा. तेव्हा सिगारेटसच्या विक्रीची किमान किंमत ठरवून देण्यात यावी, म्हणजे सिगारेटस् आणि विड्या ह्या दोघांनाही क्षेत्र राहील, असे ऑल इंडिया बिडी इंडस्ट्री फेडरेशनचे चेअरमन, श्री. देवकिसन बी. सारडा ' ह्यांनी मध्यवर्ती सरकारच्या अर्थखात्याला आवाहन केले आहे.

## आशिया आणि मध्यपूर्व यांच्या आर्थिक प्रगतीस जागतिक बँकेचे साहाय्य

जागतिक बँकेची मुख्य कचेरी वॉशिंग्टनमध्ये आहे. पण इतर बँकांसारखे दृश्य तेथे दिसत नाही. तेथे पैसे भरण्याच्या छापील पावत्या नाहीत. पैसे देणारे कॅशिअर नाहीत, पैसे काढण्यासाठी खिडकी नाही. इतर बँकांप्रमाणे येथे गिऱ्हाइकांची वर्दळही नाही. या बँकेच्या मोठ्या अत्याधुनिक इमारतीत ११० राष्ट्रांचे लोक काम करतात. या बँकेने गेल्या २६ वर्षांच्या कारकीर्दीत आपल्या सभासद-राष्ट्रांना आर्थिक प्रगतीसाठी म्हणून कोट्यावधी डॉलर्सचे साहाय्य दिले आहे. "पुनर्रचना आणि विकास यांसाठी आंतरराष्ट्रीय बँक" असे या बँकेचे औपचारिक नाव आहे.

ही अत्यंत उपयुक्त अशी संघटना आहे. एका दृष्टीने पाहिले तर ही जागतिक सहकार्याची आवाढव्य संस्था आहे. विकसनशील देशांना पैसा, आर्थिक सल्ला आणि तंत्रविषयक सल्लागार ही बँक पुरविते. आर्थिक प्रगतीसाठी आवश्यक असलेल्या शैक्षणिक व शेतीविषयक सोयी उपलब्ध करून देण्यासही ही बँक साहाय्य करते.

### विविध देशांतील कार्य

"इंटरनॅशनल फायनॅन्स कार्पोरेशन" आणि "इंटरनॅशनल डेव्हलपमेंट असोसिएशन" या संघटना जागतिक बँकेच्याच आहेत. त्यांनी अफगाणिस्थानची शिक्षणव्यवस्था, पाकिस्तानातील धान्य कोठारे, इराणमधील हमरस्ते, जॉर्डनमधील पाणीपुरवठा व शेती आणि भारतातील दळणवळण व विमानवाहतूक यांना भरपूर साहाय्य दिले आहे.

जागतिक बँकेची स्थापना १९४४ साली खाजगी भांडवलाची आंतरराष्ट्रीय गुंतवणूक वाढविण्याकरिता झाली. तसेच जेथे भांडवल नसेल, तेथे भांडवल देणे हेही जागतिक बँकेचे काम आहे. १९४६ पासून बँकेने कर्जे देण्यास सुरुवात केली. सुरुवातीची कर्जे युद्धोत्तर युरोपच्या पुनर्रचनेसाठी देण्यात आली. त्यानंतर मध्यपूर्व, आशिया आणि आफ्रिका या भागांतील देशांनाही विकासासाठी कर्जे देण्यात आली. ज्या राष्ट्रांना मदत करावयाची आहे ती राष्ट्रे व मदत देणारी राष्ट्रे अशा सर्वांनीच जागतिक बँकेच्या मूळ भांडवलाचा भरणा केला. या बँकेचे भांडवल २४ अब्ज डॉलर आहे. प्रत्येक राष्ट्राने आपल्या आर्थिक ऐपतीनुसार या भांडवलात आपला भाग घातला आहे. जुलै २३ पासून अमेरिकेस २० कोटी डॉलर्सचे कर्जरोखे विकून ही बँक आणखी भांडवल जमविणार आहे.

जागतिक बँकेच्या एकंदर कर्जापैकी एक-तृतीयांश कर्जे आशियात देण्यात आली असून मुख्यतः ती भारत, जपान व पाकिस्तान यांत वाटण्यात आली आहेत. उदाहरणार्थ, एप्रिल ३०, १९७० पर्यंत जागतिक बँकेने भारताला १ अब्ज, ४० कोटी डॉलर्सची कर्जे दिली आहेत. पाकिस्तानला ६१ कोटी, ५० लक्ष डॉलर्स व सिलोनला ९ कोटी डॉलर्सचे कर्ज दिले आहे. भारताने जागतिक बँकेकडून सर्वात अधिक कर्जे घेतली असून पाकिस्तानचा कर्जदारांत पांचवा क्रम लागतो. रस्ते, पाटबंधारे, दळणवळण, बंदरे, औद्योगिक विकास, वगैरे कार्यासाठी ही कर्जे जागतिक बँक देते.

---

### सिनेनट-नट्यांना वेतन देण्याची अभिनव विमा योजना

प्रमुख सिनेमा नट नटी, दिग्दर्शक, इत्यादींना विमा पॉलिसी द्वारा वेतन मिळण्याच्या योजनेस सेंट्रल बोर्ड ऑफ रेव्हेन्यूने मान्यता दिली आहे. ह्या योजनेप्रमाणे वेतन स्वीकारण्याचे काही प्रमुख नट-नट्यांनी मान्य केले आहे आणि १० ते १३ चित्रपटांचे करार ह्या पद्धतीने झाले आहेत. हे वेतन एकरकमेने दिले जावे, का काही वर्षांवर ते विभागले जावे, का ते कुठल्या जवळच्या नातेवाइकास मिळावे, हे विम्याच्या करारात समाविष्ट केले जाईल. प्रमुख नट-नट्या काळा पैसा घेतात, ही तक्रार आता कमी होईल आणि खोटया व्यवहारांना आळा बसेल अशी अपेक्षा आहे. ह्या योजनेप्रमाणे, चित्रपटाचा निर्माता, मोठे वेतन मागणाऱ्या नट-नटी, दिग्दर्शक, ह्यांच्या वतीने लाइफ इन्शुअरन्स कॉर्पोरेशनकडून विमा पॉलिसी घेईल आणि कराराची रक्कम हप्त्याच्या स्वरूपात भरेल. निर्माता हाच स्वतः अॅस्युइटंट होईल आणि नंतर तो संबंधित असामीला विमा पॉलिसी बेचव करील. नट-नटींना ह्यात फायदा असा आहे की, त्यांना प्रत्यक्ष रक्कम घेण्याच्या वेळी इनकमटॅक्स भरावा लागेल. निर्मात्याचा फायदा असा, की हप्त्याची सबंध रक्कम खर्चाची बाब म्हणून नफ्यातून तो वजा टाकू शकेल. आतापर्यंतच्या नियमाप्रमाणे, निर्मात्याला तीन वर्षांत उत्पादन खर्च खर्ची टाकता येत असे. आता त्याला हवे तर पहिल्याच वर्षी तो खर्ची टाकू शकेल.

---

### नगर जिल्हा सहकारी बँकेचा कर्जवसुलीत उच्चांक

पीक कर्जे व मध्यम मुदतीची कर्जे ह्यांची जून, १९७० अखेर अनुक्रमे ८६% व ८०% वसुली करून अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने महाराष्ट्रात उच्चांक प्रस्थापित केला आहे. बँकेच्या राहुरी विभागाचा वसूल तर ९९½% झाला आहे. ह्या भागातील ८४ सोसायट्यांपैकी ८२ सोसायट्यांनी बँक कर्जाची संपूर्ण वसुली दिली.

---

### वार्तापट दाखवू नका

पश्चिम बंगालमधील कम्युनिस्ट पक्षाने जमीनदारांच्या जादा जमिनी ताब्यात घेण्याची चळवळ चालू केली आहे. ह्या चळवळीची दृश्ये दाखविणारा एक वार्तापट भारत सरकारच्या चित्रपट विभागाने घेतला असून तो सर्व देशभर दाखविला जात आहे. वार्तापटांतील ही दृश्ये काढून टाकण्यात यावीत अशी मागणी पश्चिम बंगालचे सरकार करणार आहे.

---

### कर्जदार फर्म्सवर बँकांचे अप्रत्यक्ष नियंत्रण

बँकांकडे कंपन्यांचे शेअर्स तारण ठेवून कर्जे घेतली जातात. अशा तारणाची रक्कम १०,००० रु. पेक्षा जास्त असल्यास, ज्या कंपन्यांच्या शेअर्सचे तारण दिलेले असेल त्या शेअर्सच मताचे अधिकार बँकांना आता प्राप्त होतील म्हणजे, कर्ज घेणाऱ्या फर्म्सवर बँकांचे अप्रत्यक्ष नियंत्रण येईल. हे नियंत्रण टाळण्यासाठी कर्जदार फर्म्सनी कर्जफेड करून टाकली पाहिजे. बहुतेक फर्म्सना हे शक्य होणार नाही, कारण त्यांची कर्जे व ओव्हर ड्राफ्ट खूप मोठाले असतात. आपली समाजवादाची वाटचाल पटवून देण्यासाठी सरकारने हा निर्णय केलेला आहे. राष्ट्रीयीकृत आणि इतरही बँकांना ह्या निर्णयाचा फायदा मिळणार आहे. शेअर्सच्या तारणावर भरमसाठ कर्जे घेण्याच्या प्रवृत्तीस ह्यामुळे आळा बसेल, अशी अपेक्षा आहे. अग्रस्थान दिलेल्या आणि उपेक्षित विभागातील १ लक्ष रुपयांपर्यंतच्या कर्जांना हमी देण्यासाठी एक क्रेडिट गॅरंटी कॉर्पोरेशन स्थापण्याचेही सरकारने ठरविले आहे.

---

### टेलिव्हिजन प्रक्षेपणाच्या शिक्षणासाठी मदत

टेलिव्हिजनचे कार्यक्रम प्रक्षेपित करण्याचे शिक्षण देणारी एक संस्था पुणे येथे काढण्यात यावयाची आहे. ह्या शिक्षणसंस्थेसाठी लागणारी साधने व उपकरणे विकत घेण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेने १० लाख डॉलर्सची मदत देऊ केली आहे. चौथ्या पंचवार्षिक कार्यक्रमाच्या अवधीत श्रीनगर, मुंबई, पुणे, मद्रास, कलकत्ता, लखनौ आणि कानपूर ह्या सात ठिकाणी प्रक्षेपणकेंद्रे स्थापन करण्यात येणार आहेत. कार्यक्रम प्रक्षेपित करण्यासाठी अमेरिकेच्या अंतराळ संशोधन संघटनेच्या उपग्रहाचा उपयोग करण्यासंबंधी करारही झालेला आहे. चौथ्या कार्यक्रमाच्या अखेरीस भारताला ३ लाख टेलिव्हिजन सेट्सची जरुरी लागेल असा अंदाज आहे.

---

### व्हिएटनाम युद्धाचा खर्च

प्रेसिडेंट निक्सननी अधिकारपद घेतले, तेव्हा अमेरिकेचा व्हिएटनाम युद्धाचा खर्च सालिना २१,७५० कोटी रुपये होता. तो आता निम्म्यावर आणण्यात आला आहे.

**टेलिव्हिजन सेट्सच्या उत्पादनासाठी सज्जता—** फिलिप्स इंडिया लि. ने आपल्या पिंपरी येथील कारखान्यात १९ इंची टेलिव्हिजन सेट्सच्या उत्पादनाची सर्व पूर्वतयारी केली आहे. लायसेन्स मिळाल्यापासून एका वर्षाच्या आत उत्पादनास प्रारंभ होईल. सुमारे १,५०० रु. अधिक एक्साइज ड्यूटी, एवढी सेटची किंमत असेल.

**वधूवरांचा १४,४१० फूट उंच शिखरावर जाऊन विवाह—** कार्ले हिल्टनर आणि स्कॉट रश हे दोघे मौंट रेनर ह्या १४,४१० फूट उंचीच्या पर्वतशिखरावर जाऊन ४ जुलै रोजी विवाहबद्ध झाले. दोघेही गिर्यारोहण क्लबचे सभासद आहेत. १३ जणांची वऱ्हाडी मंडळी १०,००० फूट उंचीपासून पुढे चालत गेली, त्याला तेरा तास लागले.

**औद्योगिक हेरगिरी—** घड्याळे बनविणाऱ्या स्विस कंपन्यांतून एका जपानी कंपनीतर्फे हेरगिरी करून त्या कंपन्यांना नुकसानकारक अशी माहिती मिळविण्याच्या आरोपावरून स्वित्झर्लंडमध्ये एका स्विस आणि एका जपानी नागरिकाला अटक करण्यात आली आहे.

**पाकिस्तानात २०,००० कोट्यधीश आहेत—** १२ कोटी लोकसंख्येच्या पाकिस्तानातील संपत्ती २० औद्योगिक कुटुंबांत एकत्रित झालेली आहे, हे विधान खोडून काढताना कराची चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष युसुफ शिराझा म्हणाले की, पाकिस्तानातील २ हजार कुटुंबांची प्रत्येकी ७·५ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर सत्ता चालते आणि २० हजार कुटुंबांची प्रत्येकी १ कोटी रुपयांच्या मालमत्तेवर हुकुमत आहे.

**भारतातील चहाचा खप—** भारतातील चहाचा खप १९६९ मध्ये ४ कोटी पौंडांनी वाढून तो ४८ कोटी पौंड झाला. ह्याच काळात, ग्रेटब्रिटनमधील चहाचा खप २ कोटी पौंडांनी कमी होऊन तो ४७·२ कोटी पौंडांवर आला. म्हणजे आता चहापानाच्या बाबतीत भारत सर्व जगात अग्रेसर देश झाला. अर्थात, दरमाणशी खप कमीच आहे.

**यंत्रांच्या चुकीमुळे विद्यार्थी नापास—** कर्नाटक विद्यापीठ मार्कांच्या बेरजेसाठी जे यंत्र वापरते ते 'ग्रेस मार्क' मोजू न शकल्यामुळे, हजारो विद्यार्थी पास व्हावयाचे, ते नापास झाले.


बँकेतील नोकरीसाठी बँकिंग विषयाचे प्रात्यक्षिक ज्ञान मिळवा.

**बँकर्स प्रॅक्टिकल ट्रेनिंग कोर्स**

ट्रेनिंग कोर्सची मुदत ३ महिने] २९ वी बॅच सोमवार दि. १० ऑगस्टपासून सुरू [वेळ—संध्याकाळी ६ ते ७

**डेक्कन इन्स्टिटयूट ऑफ कॉमर्स**

७१७ बुधवार, जिजामाता बागेसमोर, पुणे. टे. नं. ५४९६०

## जमिनीची धूप थांबविण्याच्या प्रयत्नांचे महत्त्व

शेतीचे उत्पादन वाढविण्याचे अनेकविध प्रयत्न चालू आहेत. ह्या प्रयत्नांतून हरित क्रांती साकार होऊ लागली आहे. परंतु शेतीच्या विकासासाठी करण्यात येणाऱ्या प्रयत्नांत जमिनीची धूप थांबविण्यास जितके महत्त्व द्यावयास पाहिजे तितके अजूनही दिले जात नाही. त्यामुळे शेतीच्या व्यवसायाला धोका उत्पन्न होत आहे. भारतात शेतीसाठी उपलब्ध होऊ शकणारी जमीन मर्यादित आहे. नवीन जमीन लागवडीखाली आणण्यास आता वाव राहिलेला नाही. तरीही उपलब्ध जमिनीची होणारी नासधूस टाळण्याच्या कामी बहुतेक राज्ये फारशी कामगिरी करताना दिसत नाहीत. त्यातच जंगलाची जमीनही फाजील जंगलतोडीमुळे कमी होत चालली आहे. आदिवासी जाती आणि भूमिहीन शेतकरीही जंगलातील जमीन अनधिकाराने ताब्यात घेत असतात. ह्या सर्वांचा परिणाम नद्यांना येणाऱ्या अकल्पित पुरांच्या रूपाने दिसून येऊ लागला आहे. शिवाय जंगलतुटीमुळे घळी व खाचखळगे ह्यांनी व्याप्त अशा जमिनींचा विस्तार होत आहे. ह्या परिस्थितीची जाणीव काही राज्यांना तरी होऊ लागलेली दिसत आहे. मध्य प्रदेश सरकारने राज्यातील अशा प्रकारची जमीन लागवडीयोग्य करण्यासाठी ७६ कोटी रुपये खर्चाची एक योजना हाती घेतली आहे. योजना पूर्ण झाल्यावर सुमारे ८ लाख एकर जमीन शेतीसाठी नव्याने उपलब्ध होऊ शकेल. हरिआणा सरकारने राजस्थानच्या ओसाड जमिनीचे आक्रमण थोपविण्यासाठी जंगलपट्टा तयार करण्याचे ठरविले आहे. त्यासाठी ऑस्ट्रेलिआ व इस्राइल ह्या देशांकडून काही जातीच्या झाडांची आयात करण्यात येत आहे. ह्या झाडांमुळे जमिनीची धूप थांबते.

---

## हवा खाऊन राहणारा निसर्गोपचारक

पाटणा येथील एक निसर्गोपचाराचे तज्ज्ञ डॉ. भगवानदास आर्य ह्यांनी असा दावा केला आहे की ते आणि त्यांच्या कुटुंबातील मंडळी गेले कित्येक दिवस केवळ हवा व पाणी ह्यांचे सेवन करून जिवंत राहिले आहेत. त्यांच्या मताने अशा तऱ्हेने कितीही काळ जगणे शक्य आहे. त्यांचा हा दावा खरा की खोटा हे अजमावून पाहाण्याची बिहारच्या आरोग्य खात्याने पाटणा मेडिकल कॉलेज इस्पितळाच्या प्रमुखांना सूचना केली आहे. डॉ. आर्य ह्यांनी प्रमुखाची भेट घ्यावी असे त्यांना कळविण्यात आले आहे. खुद्द डॉ. आर्य ह्यांनी अशी विनंती केली आहे की हवापाण्यावर राहण्याच्या प्रयोगात त्यांचे सर्व कुटुंब सामील होणार आहे. प्रयोगाच्या अवधीत सर्वांना सकाळी फिरण्याची मात्र मुभा असावी आणि त्या वेळी एखादा पोलीस बरोबर असावा असेही त्यांनी सुचविले आहे.

---


THE BELGAUM BANK LIMITED

Estd. 1930

SCHEDULED BANK


*Regd. Office* : 659-60, Raviwar Peth, Belgaum

Share Capital : Rs. Over 8 Lakhs
Reserves : Rs. Over 8½ Lakhs
Deposits : Rs. 5 Crores & 75 Lakhs

39 Branches in the States of Mysore & Maharashtra & Goa Territory – Major number of Branches in Rural Areas – Facility of Safe Deposit Lokers at Belgaum, Gokak and Nipani Branches in Mysore State.

S. Y. KAMAT
*General Manager.*

K. B. KIRTIKAR
*Chairman.*




GADRE BROTHERS
ENGINEERS & FOUNDERS
MADHAVNAGAR (S. Rly.)
Phone : 318 @ Sangli
Gram : 'SEWA Madhavnagar

## मॅनेजिंग डायरेक्टर आणि मॅनेजर ह्यांचे

### पगार, भत्ते, सुखसोई, इत्यादींचे नियम

कंपनी लॉ अफेअर्सच्या खात्याने गेल्या वर्षाच्या नोव्हेंबरमध्ये पब्लिक लिमिटेड कंपन्यांचे मॅनेजिंग डायरेक्टर, पूर्ण वेळ/काही वेळ काम करणारे डायरेक्टर आणि मॅनेजर ह्यांना दरसाल ९०,००० रुपयांपेक्षा जास्त पगार असता कामा नये, असे ठरविले. त्यासेरीज निवळ नफ्याच्या १% पर्यंत कमिशन घेण्यास त्यांना मुभा ठेवण्यात आली. इतर सोई-सवलतींची किंमत पगाराच्या एकतृतीयांशापेक्षा (सालिना ३०,००० रु.) अधिक असता कामा नये, असेही ठरविण्यात आले. ह्या किमतीची बेरीज करताना खालील गोष्टी वगळण्यात आल्या आहेत :—

१. कंपनीने प्रॉव्हिडंट फंडाला द्यावयाची रक्कम. ती पगाराच्या १०% पेक्षा जास्त असता कामा नये.

२. कंपनीने पेन्शन / सुपर ॲन्युएशन फंडाला द्यावयाची रक्कम. ही रक्कम आणि वरील (१) मधील रक्कम ह्यांची बेरीज पगाराच्या २५% पेक्षा जास्त होता कामा नये.

३. ग्रॅच्युइटी. प्रत्येक वर्षाच्या नोकरीला अर्ध्या महिन्याच्या पगारापेक्षा जास्त नाही. ही रक्कम २४,००० रु. किंवा १५ महिन्यांचा पगार ह्यापेक्षा अधिक असू शकणार नाही.

४. स्वतःच्या आणि कुटुंबीयांच्या वैद्यकीय उपचाराचा खर्च. त्याची रक्कम एका वर्षात एक महिन्याच्या पगारापेक्षा अधिक असू शकणार नाही. त्याची कमाल मर्यादा एका वर्षासाठी ५,००० रुपये आणि तीन वर्षांसाठी १५,००० रु. असेल.

५. संचालकांना व त्यांच्या कुटुंबीयांना स्वदेशी जाण्या-येण्यासाठी येणारा खर्च, इकॉनॉमी क्लासने वर्षातून एकदा फर्स्ट क्लासने जावयाचे असल्यास दोन वर्षांतून एकदा.

६. स्वतःचा, पत्नीचा, अपत्यांचा सुटीमधील भारतातील प्रवासखर्च.

७. भरपगारी रजा आणि भत्ते, कंपनीच्या इतर अधिकाऱ्यांना मिळतात त्याप्रमाणे.

वरील सात कलमातील बाबींवर ठरवून दिलेल्यापेक्षा अधिक खर्च झाला, त्याचप्रमाणे खालील बाबींवर ठरवून दिलेल्यापेक्षा जास्त खर्च झाला, तर त्याला १०,००० रुपयांची कमाल मर्यादा लागू होईल. म्हणजे त्यातून तो खर्च कमी केला जाईल.

अ. फर्निचरसह राहण्याची जागा.



ब. मोटारीचा मोफत वापर.

क. दरसाल १,००० रु. पेक्षा जास्त हप्ता असणार नाही, एवढ्या रकमेचा अपघाताचा विमा.

ड. घरी मोफत टेलिफोन.

पाहुणचार व चहापाणी ह्यांसाठी कंपनीच्या धंद्याप्रीत्यर्थ केलेला खर्च कंपनी देईल. त्याची कमाल /मर्यादा ज्या त्या कंपनीने ठरवून द्यावी अशी अपेक्षा आहे.

संचालकांनी संचालक मंडळाच्या आणि कमिट्यांच्या सभांना उपस्थित राहावयाचे ते नोकरीचा आवश्यक भाग म्हणून. त्यासाठी फी मिळणार नाही, असे सामान्यतः धोरण राहील.




इंजिन असो अगर इलेक्ट्रिक मोटार असो त्यांस "विजय" पंपाची आवश्यकता आहेच. विजय पंप विनातक्रार अखंड पाणीपुरवठा करतात.

कारखानदार—

न्यू विजय इंडस्ट्रीज लि.

विश्रामबाग–सांगली (महाराष्ट्र)

फोन : २३२ तार : Vijayplow

# नहीं—
# यह कोई
# साधारण कार्य नहीं!

# सरदार
## सोडा वाटर
## यंत्रसामग्री

यह यंत्रसामग्री ६० वर्ष पहिले प्रस्तुत की गयी है और आजभी इसकी कोई तुलना नहीं। भारत और पूरबी देशों में हजारों की संख्या में ये यंत्र उपयोगमें हैं और सैनिकी भोजनशाला, क्लब, अस्पताल, उपाहारगृह और खाद्यालय आदि में ये कितने ही यंत्र गत २० वर्षोंसे काम देते आये हैं।

हर दिन ५० से ४०० दर्जनों तक शीतल पेयों की बोतलें निर्माण करनेवाले इन यंत्रों की कीमत का थोड़े ही काल में कई गुना मुबदला मिल जाता है।

हमारे दूसरे निर्माण है: १. रंगहीन द्रव कार्बन डायआक्साईड वायु जो कार्बोनेशन में तथा आग बुझाने में उपयोगी है, २. सोडा वाटर यंत्रों के कलपुर्जे, ३. सूखा बरफ

**यंत्रों और कलपुर्जोंकी नकल से सावधान रहिये**



क्लब सोडा वाटर यंत्र

घरेलू सोडा वाटर यंत्र

## दि सरदार कार्बोनिक गैस कंपनी लिमिटेड

[illegible] विठ्ठलदास चेम्बर्स, १६, अपोलो स्ट्रीट, बम्बई १.

फोन: कार्यालय: २५३३७१ कारखाना: [illegible]



आपल्या प्रेमाला मूर्त स्वरूप द्या: आपल्या प्रेमातील माणसाच्या भविष्यकाळासाठी तरतूद करा. त्यांच्यासाठी बचतीस सुरवात करण्याची दिरंगाई करू नका. आपल्या मुलांच्या नांवाने बँक ऑफ इंडियामध्ये सेव्हिंग्ज बँक खाती उघडा.

## कोरडे प्रेम काय कामाचे...

**बँक ऑफ इंडिया**

RAAS/B/1098 MAR.

# दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लिमिटेड

मुख्य कचेरी :
९ बेक हाऊस लेन,
फोर्ट, मुंबई १.

प्रादेशिक कचेरी :
महाल, नागपूर

| | | |
|---|---|---|
| भाग-भांडवल व निधी | रु. | १४,६२,२०,००० |
| ठेवी | रु. | ७४,५७,३६,००० |
| खेळते भांडवल | रु. | १,४२,०९,१२,००० |

१. ठेवींवरील व्याजाचे आकर्षक दर.
२. सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.
३. देशातील सर्व प्रमुख ठिकाणी बिलवसुलीची व्यवस्था.
४. राज्यात १००० हून अधिक कचेऱ्या असणाऱ्या सहकारी पत-पुरवठा व्यवस्थेतील शिखर संस्था.

**सामुदायिक हितासाठी सदैव झटणारी बँक**

तारेचा पत्ता : " मॉर्गेज "
दूरध्वनी : मुख्य कार्यालय २६७८०१/२/३
कार्यकारी संचालक २६१४९७

# दि बॉंबे स्टेट को-ऑपरेटिव्ह लँड मॉर्गेज बँक लि.

जे. के. बिल्डिंग, १ रा माळा, नरोत्तम मोरारजी मार्ग,
बॅलार्ड इस्टेट, मुंबई नं. १.
( स्थापना १९३५ )

महाराष्ट्र राज्यातील २७ प्राथमिक भूविकास बँका या बँकेस संलग्न आहेत. बँकेने तगाई योजनेखाली विहिरी, ऑईल इंजिन्स, पंपिंग सेट्स्, इलेक्ट्रिक मोटर्स तसेच जमीनसुधारणेकरिता कर्ज-वाटपाचा व्यवहार हाती घेतला आहे. जून १९६९ अखेर बँकेचे भागभांडवल ६ कोटी ६६ लाख, गंगाजळी ४५ लाख, ऋणविमोचन निधीची गुंतवणूक २८ कोटी व येणे कर्ज ८५ कोटी आहे.

नी. आ. कल्याणी
अध्यक्ष

रा. गो. गोखले
व्यवस्थापक

जी. पी. भावे
कार्यकारी संचालक

हे पत्र पुणे, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५/१ आर्यभूषण छापखान्यात या वृत्तपत्राचे मालक श्री. श्रीपाद वामन काळे यांनी छापिले व 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ), पुणे ४, येथे प्रसिद्ध केले. ( वार्षिक वर्गणी रु. ६ )